**नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका - एकसदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार प्रभाग रचना करण्याबाबतचे सुधारित आदेश**

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१/का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ६ फेब्रुवारी, २०२०

संदर्भ :- १) शासनाचा सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १, दि. २७ जानेवारी, २०२०.
२) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक - रानिआ/नपा-२०१६/ प्र.क्र.१०/ का-६,दि. १५/०६/२०१६

## आ दे श

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए मधील तरतुदीनुसार नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची पूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे;

१.१ आणि ज्याअर्थी, भारतीय संविधान व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ मधील तरतुदीनुसार नगरपरिषदेची/नगरपंचायतीची मुदत संपण्यापूर्वी तिची सार्वत्रिक निवडणूक घेणे आवश्यक आहे.

१.२ आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.४/का-५, दिनांक- २७/०१/२००५ अनुसार स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत ज्या महिन्यात संपत असेल त्याच्या सहा महिने अगोदरच्या कालावधीमध्ये, तिच्या क्षेत्रात व हद्दीमध्ये निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बदल करता येणार नाहीत.

१.३ आणि ज्याअर्थी, शासनाने दिनांक २७ जानेवारी, २०२० रोजी प्रसिध्द केलेल्या "महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२०" अन्वये सर्व नगरपरिषदांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीऐवजी एकसदस्यीय प्रभाग पध्दती लागू केलेली आहे;

१.४ आणि ज्याअर्थी, वरीलप्रमाणे नगरपरिषदांमध्ये एकसदस्यीय प्रभाग पध्दती लागू झाली असल्यामुळे राज्य निवडणूक आयोगाचे यापूर्वीचे नगरपरिषद/नगरपंचायत प्रभाग रचनेबाबतचे क्रमांक - रानिआ / नपा-२०१६ / प्र.क्र.१० /का-६, दि.१५/६/२०१६ चे आदेश अधिक्रमित करून सदर नगरपरिषदा/ नगरपंचायतीकरिता सुधारित आदेश काढणे आवश्यक झाले आहे.

२. त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १० व १० अ (४) यानुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करून मी, यु. पी. एस. मदान, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र, उपरोक्त दिनांक १५/०६/२०१६ चे आदेश अधिक्रमित करून, नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रभाग रचना करणे व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे याकरिता खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

## ३. आ दे श

३.१ राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाप्रमाणे नगर परिषदा/नगरपंचायतींच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. त्यांनी राज्य निवडणूक आयोगाने प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून निवडणुका योग्यप्रकारे पार पाडाव्यात.

३.२ प्रभाग रचना करण्याबाबतचे मुख्य टप्पे खालील प्रमाणे आहेत :-

(i) प्रारुप प्रभागांची रचना करणे.
(ii) आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याकरिता मागील निवडणुकांमधील आरक्षणाची निश्चिती करणे.
(iii) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे.
(iv) प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता घेणे.
(v) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसह) आरक्षणाची सोडत काढणे.
(vi) प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करणे.
(vii) प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी.
(viii) हरकती व सूचना विचारात घेऊन अंतिम प्रभाग रचना तयार करणे.
(ix) अंतिम प्रभाग रचनेस मान्यता घेऊन प्रसिध्दी देणे.

४. प्रारुप प्रभागांची रचना करणे.

(४.१) **गृहित धरावयाची लोकसंख्या:-** जनगणना कार्यालयाने प्रसिध्द केलेल्या २०११ च्या जनगणनेनुसार नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्राची प्रगणक गटनिहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जातीची व अनुसूचित जमातीची लोकसंख्या व प्रगणक गटाचे नकाशे जनगणना कार्यालयाकडून उपलब्ध करून घ्यावेत. या लोकसंख्येच्या आधारावरच **परिशिष्ट-१** मध्ये दिल्यानुसार सदस्य संख्या व आरक्षणाची परिगणना करण्यात यावी.

(४.२) **नकाशावर प्रगणक गटाची मांडणी:-** नगरपरिषद/नगरपंचायतीच्या गुगल अर्थ नकाशावर प्रगणक गटांची मांडणी करण्यात यावी. अशी मांडणी करताना नगरपरिषद/नगरपंचायतीचे कोणतेही क्षेत्र सुटणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

(४.३) **प्रभागांची संख्या ठरविणे:-** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ९ व १० मधील तरतुदीनुसार नगरपरिषद/नगरपंचायतीची एकूण सदस्य संख्या व आरक्षित सदस्य संख्या निश्चित करावी. एकूण सदस्य संख्येइतके प्रभाग तयार करणे आवश्यक राहील.

(४.४) **प्रभागांची सरासरी लोकसंख्या:-** प्रभाग रचना करताना नगरपरिषद/नगरपंचायतीची एकूण लोकसंख्या भागिले नगरपरिषद/नगरपंचायतीची एकूण सदस्य संख्या या सूत्रानुसार प्रभागाची सरासरी लोकसंख्या निश्चित करावी. प्रभागाची लोकसंख्या त्या प्रभागाच्या सरासरी लोकसंख्येच्या १० टक्के कमी किंवा १० टक्के जास्त या मर्यादेत ठेवता येईल. एखाद्या अपवादात्मक परिस्थितीत प्रभागाची लोकसंख्या या किमान किंवा कमाल मर्यादेपेक्षा कमी किंवा जास्त असल्यास त्याचे कारण प्रभाग रचनेच्या प्रस्तावात नमूद करणे आवश्यक राहील.

(४.५) **रचनेची दिशा:-** प्रभाग रचना सुरु करताना सर्वप्रथम उत्तर दिशेकडून सुरुवात करावी. उत्तरेकडून ईशान्य (उत्तर-पूर्व) त्यानंतर पूर्व दिशेकडे येऊन पूर्वेकडून पश्चिमेकडे प्रभाग रचना

करत सरकावे व शेवट दक्षिणेत करावा. प्रभागांना क्रमांकही त्याच पध्दतीने द्यावेत. प्रभाग रचना करताना भौगोलिक सलगता राहील, याची काळजी घ्यावी.

(४.६) **<u>प्रभागाच्या सीमारेषा:-</u>** प्रभागाच्या सीमारेषा या नद्या, नाले, डोंगर, मोठे रस्ते, छोटे रस्ते, गल्ल्या, फ्लायओव्हर इत्यादी नैसर्गिक मर्यादा विचारात घेऊन निश्चित करावी. कोणत्याही परिस्थितीत एका इमारतीचे, चाळीचे, घराचे विभाजन दोन प्रभागांमध्ये होणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे मोकळ्या जागांसह सर्व जागा कोणत्या ना कोणत्या प्रभागात अंतर्भूत असायला हव्यात. प्रभाग रचनेच्या बाबतीत कोणासही शंका घेण्यास वाव राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. सीमेचे वर्णन करताना रस्ते, नाले, नद्या, सिटी सर्व्हे नंबर इ. यांचे उल्लेख प्रामुख्याने यावयास हवे.

(४.७) **<u>महत्वाची तत्वे:-</u>** प्रभाग रचना करताना लोकसंख्या व प्रभागाची भौगोलिकदृष्टया आटोपशीर व्याप्ती या दोन मुख्य गोष्टी असल्या तरी नागरिकांच्या सामायिक हिताकरिता खालील बाबी विचारात घ्याव्यात.

(अ) प्रभागातील वस्त्यांचे शक्यतोवर विभाजन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(ब) अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती यांच्या वस्त्यांचे शक्यतोवर विभाजन होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

(क) नागरिकांचे प्रभागामधील दळणवळण शक्यतो विचारात घ्यावे.

(ड) प्राथमिक आरोग्य सुविधा केंद्रे, दवाखाने, स्मशानभूमी, बाजारहाटाच्या जागा, पाणी पुरवठयाच्या तसेच जलनि:सारणाच्या सोयी सुविधा, इ.चा वापर ज्या नागरिकांकडून करण्यात येतो त्या नागरिकांचा समावेश असलेल्या प्रभागातच शक्यतोवर त्या सोयी सुविधा ठेवण्यात याव्यात.

(इ) प्रभागातील मुलांकरिता सर्वसाधारणपणे उपलब्ध असणाऱ्या सोयीसुविधा उदा. प्राथमिक शाळा, मैदाने, इ. शक्यतोवर त्याच प्रभागात ठेवण्यात याव्यात.

(४.८) **<u>प्रगणक गट फोडू नये:-</u>** प्रभाग रचना करताना प्रगणक गट शक्यतो फोडू नये. अपवादात्मक परिस्थितीमध्ये प्रभाग रचना करण्याकरिता प्रगणक गट फोडणे आवश्यक असेल व घर यादी

उपलब्ध नसेल, तर त्या प्रकरणी सोबतच्या **परिशिष्ट-८** मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्वेक्षण करून संबंधित क्षेत्रात लोकसंख्या कशाप्रकारे वितरित झाली आहे, हे निश्चित करावे. सर्वेक्षण करताना जनगणना ज्यावेळी झाली त्यावेळी म्हणजे २०११ मध्ये लोकसंख्येचे वितरण कसे होते, हे जाणून घ्यावयाचे असल्याने सर्वेक्षण करताना २०११ मध्ये जनगणनेच्यावेळी संबंधित व्यक्ती दिलेल्या पत्त्यावर राहात होती किंवा कसे, संबंधित इमारत कधी बांधण्यात आली इत्यादी बाबी लक्षात घ्याव्यात.

(४.९) **सीमारेषेचे वर्णन:-** प्रत्येक प्रभागाच्या सीमारेषेचे वर्णन करताना उत्तर, पूर्व, दक्षिण व पश्चिम अशा दिशा नमूद करून सीमारेषेचे वर्णन करावे. सीमारेषा नमूद करताना शहरातील सर्वसाधारण नागरिकाना प्रभागाची पूर्ण कल्पना येईल याची काळजी घ्यावी.

(४.१०) **प्रभागाचे क्रमांक व नाव:-** प्रभाग रचनेमध्ये प्रभागांना अनुक्रमांक देण्यात येतात. प्रभागाचे क्षेत्र चटकन लक्षात यावे याकरिता प्रभागांना अनुक्रमांकासोबत प्रभागाचे नाव देता येईल किंवा कसे हे तपासावे. प्रभागांना नाव देणे हे बंधनकारक नाही. तथापि, मुख्याधिकारी प्रभागांना नाव देण्याबाबत निर्णय घेऊ शकतात. प्रभागांना नाव द्यावयाचे झाल्यास ते अशाप्रकारे देण्यात यावे जेणेकरुन सदर प्रभाग कोणत्या क्षेत्रातील आहे हे तात्काळ लक्षात येईल. उदा. त्या प्रभागातील प्रसिध्द असलेले महत्वाचे ठिकाण अथवा त्या प्रभागातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले एखादे नगर अथवा वस्ती, इ.

(४.११) **प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव:-** त्यानंतर प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव संबंधित मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत यांनी पुढीलप्रमाणे तयार करावा.

(i) व्यवस्थित माहिती भरलेले परिशिष्ट-१ ते परिशिष्ट-११

परिशिष्ट १ - सदस्य संख्या व आरक्षणाची परिगणना.
परिशिष्ट २ - हद्दींची व्याप्ती व वर्णनाबाबत.
परिशिष्ट ३ - निवडणूक प्रभागांमध्ये समाविष्ट प्रगणक गट व लोकसंख्या
परिशिष्ट ४ - प्रगणक गटनिहाय माहिती.

परिशिष्ट ५ - अनुसूचित जातीचा प्रभागनिहाय उतरता क्रम.

परिशिष्ट ६ - अनुसूचित जमातीचा प्रभागनिहाय उतरता क्रम.

परिशिष्ट ७ - सदस्य संख्या व आरक्षणाचे एकत्रित विवरणपत्र.

परिशिष्ट ८ - प्रगणक गटाचे विभाजन करताना द्यावयाचे.

(ii) गुगल अर्थचा अथवा इतर नकाशा, या नकाशावर प्रगणक गटांच्या सीमा हिरव्या रंगाने दर्शवाव्यात. प्रगणक गटांचे क्रमांक व त्या प्रगणक गटांची लोकसंख्या दर्शवावी.

(iii) जनगणना प्रभागांच्या सीमा, निळया रंगाने दर्शवाव्यात.

(iv) नकाशावर शहरातील महत्वाची ठिकाणे, रस्ते, नद्या, नाले, रेल्वे लाईन इत्यादी स्पष्टपणे दर्शवावे.

(v) नवीन निवडणूक प्रभागांच्या हद्दी लाल रंगाने दर्शविण्यात याव्यात.

(vi) नकाशांचा आकार, नकाशावर दर्शविलेले प्रगणक गटांचे क्रमांक, लोकसंख्या, इत्यादी तपशील वाचता येईल या प्रमाणात असावा. नकाशे सुलभपणे हाताळता यावेत याकरिता आवश्यक असल्यास दोन किंवा तीन भागात तयार करावेत.

(vii) प्रत्येक प्रभागाचा स्वतंत्र नकाशा तयार करावा, त्याच्या हद्दी स्पष्टपणे दर्शविण्यात याव्यात. त्या हद्दींवर असणारे रस्ते, नद्या, नाले, रेल्वे लाईन इत्यादी स्पष्टपणे नकाशावर नमूद करावेत.

(viii) प्रत्येक प्रभागामध्ये समाविष्ट झालेले प्रगणक गट व नकाशानुसार त्या प्रभागामध्ये समाविष्ट होणारे प्रगणक गट एकच आहेत, याची खात्री करावी. तसेच जनगणनेकडून प्राप्त झालेली लोकसंख्येची आकडेवारी योग्यरित्या दर्शविण्यात आली आहे, याची खात्री करावी.

## ५. आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याकरिता मागील निवडणुकांमधील आरक्षणाची निश्चिती करणे:-

i. आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याच्या प्रयोजनार्थ आगामी निवडणूक ही एक सदस्यीय प्रभाग पध्दतीने सलग कितवी निवडणूक आहे हे सर्वप्रथम विचारात घेण्यात यावे. त्यानुसार उदा. सन २०२० मधील निवडणूकांकरीता यथास्थिती सन २००५, २०१० व सन २०१५ मधील प्रभागांचे आरक्षण विचारात घ्यावे. त्यानुसारच या निवडणुकीमध्ये आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे आवश्यक आहे.

ii. याकरिता एखाद्या प्रभागात मागील निवडणुकीत कोणते आरक्षण होते हे निश्चित करताना पुढील कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी- आरक्षणाकरिता एखादा प्रभाग नवीन आहे किंवा कसे, हे केवळ त्याच्या नावावरुन ठरविण्यात येणार नाही. एखाद्या प्रभागावरील पूर्वीचे आरक्षण ठरविण्यासाठी जे (Enumeration Block) प्रगणक गट त्या प्रभागात समाविष्ट केले गेले आहेत त्यावरील जास्तीत जास्त समान आरक्षण असलेल्या प्रगणक गटांच्या लगतच्या जनगणनेनुसार असलेल्या एकूण लोकसंख्येची बेरीज घ्यावी. ही लोकसंख्येची बेरीज प्रभागाच्या एकूण लोकसंख्येच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक होत असेल तर तो प्रभाग मागील निवडणुकीमध्ये त्या प्रवर्गाकरिता आरक्षित झाला होता असे मानण्यात यावे; आणि त्या प्रवर्गाचे आरक्षण पुन्हा त्या प्रभागावर टाकता येणार नाही. मात्र, जास्तीत जास्त समान आरक्षण असलेल्या प्रगणक गटांच्या लगतच्या जनगणनेनुसार असलेल्या एकूण लोकसंख्येची बेरीज प्रभागाच्या एकूण लोकसंख्येच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी होत असेल तर तो प्रभाग नवीन आहे असे मानण्यात येईल व त्या प्रभागावर कोणत्याही प्रवर्गाचे आरक्षण टाकता येईल. याकरिता सोबत दिलेल्या **परिशिष्ट-७** मध्ये मागील निवडणूकीतील सर्व प्रभागांवर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग तसेच स्त्रियांचे आरक्षण निश्चित करावे.

(iii) सन २००५-२००६ पर्यंत झालेल्या निवडणुकांमध्ये आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याची कार्यपध्दती अवलंबिण्यात आली नव्हती. मात्र मा. उच्च न्यायालयाने औरंगाबाद जिल्हापरिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या अनुषंगाने रिट पिटीशन क्र. ५३८६/२००६ (उदय पवार विरुध्द राज्य निवडणूक आयोग व इतर) मध्ये दि. ३ ऑक्टोबर, २००६ रोजी व त्यानंतर रिट पिटीशन क्र. ६३८९/२००६ (प्रशांत बंब विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर) (**Reported in 2007 (2) BCR 604**) मध्ये दिलेल्या निर्णयानुसार नगर परिषदा/नगर पंचायतींच्या निवडणुकांमध्ये देखील आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्यास सुरुवात केली.

६. <u>अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे:-</u>

**६.१ अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता एकच पद देय असल्यास:-**

(अ) नव्याने स्थापन होणाऱ्या नगर परिषदा/नगरपंचायतीमध्ये अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमातीसाठी एकच जागा अनुज्ञेय होत असल्यास, ती जागा अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी आरक्षित होईल किंवा कसे हे सोडतीने ठरविण्यात यावे.

(ब) अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमातीसाठी मागील व आगामी होणाऱ्या निवडणुकीसाठी एकच जागा अनुज्ञेय होत असल्यास, मागील निवडणुकीत जर ती जागा त्या जाती/जमातीच्या महिलेसाठी आरक्षित असेल तर ती जागा आगामी होणाऱ्या नगर परिषदा/नगर पंचायत निवडणुकीसाठी संबंधित प्रवर्गातील महिलेसाठी आरक्षित होणार नाही. तसेच मागील निवडणुकीत जर ती जागा त्या जाती/जमातीच्या महिलेसाठी आरक्षित नसेल तर ती जागा आगामी होणाऱ्या निवडणुकीसाठी संबंधित प्रवर्गातील महिलेसाठी थेट आरक्षित होईल.

६.२ नगरपरिषदा/नगरपंचायतीच्या निवडणुकीकरिता अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे यासंबंधीची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे असेल:-

i. **अनुसूचित जातीचे प्रभाग निश्चित करणे :-** नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्रातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची टक्केवारी ज्या प्रभागांमध्ये सर्वाधिक आहे, त्या प्रभागापासून सुरुवात करून उतरत्या क्रमाने सर्व प्रभाग लावावेत. **(परिशिष्ट-५)** त्यानंतर यापूर्वीच्या निवडणुकांमध्ये (उदा.सन २००५, २०१० व २०१५) सदर आदेशाच्या परिच्छेद ५ मधील तरतुदीनुसार यथास्थिती अनुसूचित जातीकरिता आरक्षित झालेले प्रभाग चिन्हांकीत करुन वगळण्यात यावे. त्यानंतर उर्वरित प्रभागांपैकी अनुसूचित जातीसाठी अनुज्ञेय असलेल्या जागा, अनुसूचित जातीची टक्केवारी सर्वाधिक असलेल्या प्रभागापासून सुरुवात करून अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता आरक्षण नेमून देण्यात यावे. असे करताना

जर सर्व प्रभागांमध्ये आरक्षणाचे चक्र पूर्ण झाले असल्यास (यापूर्वीच्या निवडणुकीमधील उदा. सन २००५, २०१० व २०१५ आणि या निवडणुकीतील), तर पुन्हा उतरत्याक्रमाने असलेल्या पहिल्या प्रभागापासून सुरुवात करावी.

ii. **अनुसूचित जमातीचे प्रभाग निश्चित करणे:-** नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची टक्केवारी ज्या प्रभागांमध्ये सर्वाधिक आहे, त्या प्रभागापासून सुरुवात करून उतरत्या क्रमाने सर्व प्रभाग लावावेत. **(परिशिष्ट-६)** त्यानंतर यापूर्वीच्या निवडणुकांमध्ये (उदा.सन २००५, २०१० व २०१५) सदर आदेशाच्या परिच्छेद ५ मधील तरतुदीनुसार यथास्थिती अनुसूचित जमातीकरिता आरक्षित झालेले प्रभाग चिन्हांकीत करुन वगळण्यात यावे. त्यानंतर उर्वरित प्रभागांपैकी अनुसूचित जमातीसाठी अनुज्ञेय असलेल्या जागा, अनुसूचित जमातीची टक्केवारी सर्वाधिक असलेल्या प्रभागापासून सुरुवात करून अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता आरक्षण नेमून देण्यात यावे. असे करताना जर सर्व प्रभागांमध्ये आरक्षणाचे चक्र पूर्ण झाले असल्यास (यापूर्वीच्या निवडणुकीमधील उदा.सन २००५, २०१० व २०१५ आणि या निवडणुकीतील), तर पुन्हा उतरत्याक्रमाने असलेल्या पहिल्या प्रभागापासून सुरुवात करावी.

iii. परंतु, जर एखादा प्रभाग अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या दोन्हीसाठी आरक्षित होत असेल तर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यापैकी ज्यांच्या लोकसंख्येची प्रभागातील टक्केवारी अधिक असेल त्या प्रवर्गाकरिता तो प्रभाग आरक्षित होईल व त्यामुळे संबंधित अनुसूचित जाती / जमातीचे आरक्षण उतरत्या क्रमाने पुढील प्रभागात देण्यात येईल.

जर एखादा प्रभाग अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता उतरत्या क्रमाने आरक्षित होत असेल आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती दोघांचीही त्या

प्रभागातील टक्केवारी समान असेल तर तो प्रभाग अनुसूचित जमातीकरिता आरक्षित होईल. कारण अनुसूचित जमातीची लोकसंख्या ही विशिष्ट क्षेत्रामध्येच समाविष्ट असते.

**७. प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देणे:-**

प्रारुप प्रभाग रचना राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार व योग्य ती दक्षता घेऊन तयार करण्यात आलेली आहे याची तपासणी करुन त्याबाबत परिशिष्ट- ९ मधील नमुन्यातील प्रमाणपत्र संबंधित मुख्याधिकारी प्रारुप प्रस्तावा सोबत सादर करतील. सार्वत्रिक निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या सदर प्रारुप प्रभाग रचनेची तपासणी जिल्हाधिकारी करतील व त्यास मान्यता देतील.

**८. नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसह) आरक्षणाची सोडत काढणे:-**

(८.१) जिल्हाधिकारी यांनी प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर मुख्याधिकारी यांनी नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्रामध्ये सभा आयोजित करून नागरिकांच्या समोर सोडत पध्दतीने नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसह) राखीव जागांचे आरक्षण निश्चित करावे.

(८.२) मुख्याधिकारी यांनी जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली सोडत काढावी.

(८.३) सोडतीचे स्थळ, वेळ व दिनांक यांना मोठया प्रमाणावर प्रसिध्दी द्यावी. (उदा. स्थानिक वृत्तपत्रे, केबल टी.व्हि.वर, नगपरिषदा/नगपंचायतींच्या प्रभाग समितीचे व इतर कार्यालयातील सूचना फलक, जिल्हाधिकारी व तहसिल कार्यालयाचे सूचना फलक, स्थानिक पातळीवरील इतर माध्यमे, जिल्हाधिकारी व नगरपरिषद/नगरपंचायतीच्या संकेत स्थळावर इत्यादी) आरक्षणाची सोडत व प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दी याकरिता वर्तमानपत्रात द्यावयाच्या सूचनेचा नमुना **परिशिष्ट-१०** मध्ये देण्यात आला आहे.

(८.४) नगरपरिषद/नगरपंचायतीच्या निवडणुकांकरिता आरक्षणाची सोडत काढण्याबाबत मार्गदर्शक तत्वे सोबतच्या **परिशिष्ट-११** मध्ये नमूद करण्यात आलेली आहेत.

(८.५) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला यांच्याकरिता आरक्षित असलेले प्रभाग पुढील निवडणुकीमध्ये चक्रानुक्रमे फिरविणे आवश्यक आहे. असे करताना एखाद्या प्रभागात मागील निवडणुकीमध्ये कोणते आरक्षण होते हे सदर आदेशाच्या परिच्छेद ५ मधील तरतुदीनुसार निश्चित करून पुढील निवडणुकीमध्ये ते आरक्षण शक्यतोवर येणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

(८.६) एखाद्या परिस्थितीमध्ये त्याच प्रभागावर जुनेच आरक्षण पुन्हा येणार नाही यासाठी सर्व प्रयत्न झाल्यानंतर ते आरक्षण पुन्हा त्याच प्रभागात येत असेल तर ते येऊ देण्यास हरकत नाही.

(८.७) अनुसूचित जातीच्या महिलांकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करण्याकरिता अनुसूचित जातीकरिता आरक्षित झालेल्या प्रभागांमधून सोडत काढण्यात यावी. मात्र मागील निवडणुकीमध्ये कोणत्याही प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित झालेले प्रभाग त्यावेळी वगळण्यात यावेत. असे प्रभाग वगळल्यानंतर उर्वरित प्रभाग अनुसूचित जातीच्या महिला आरक्षणाकरीता विचारात घ्यावेत व त्यातुन सोडत काढण्यात यावी.

जर असे प्रभाग आवश्यकतेपेक्षा कमी प्रभाग उपलब्ध होत असतील तर ते अनुसूचित जातीच्या महिलांकरिता थेट आरक्षित होतील. आणि त्यानंतर उर्वरित जागांकरीता वगळण्यात आलेल्या अनुसूचित जातीच्या प्रभागातून पुढे नमूद तत्वानुसार सोडतीने निश्चित करण्यात यावेत.

असे करताना शक्यतोवर लगतच्या निवडणूकीमध्ये महिलांकरीता आरक्षित झालेले प्रभाग पुन्हा महिलांकरीता आरक्षित होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. प्रथम यथास्थिती मागील एकाही निवडणूकीमध्ये महिलांकरीता आरक्षित न झालेल्या प्रभागांना प्राधान्य देण्यात यावे. जर असे प्रभाग नसतील तर, सर्वात अगोदरच्या निवडणूकीपासून महिलांकरीता आरक्षित झालेल्या प्रभागांचा विचार करावा (उदा. प्रथम केवळ २००५, नंतर २०१० व इतर पर्याय नसल्यास २०१५). काही अपरिहार्य परिस्थितीमध्ये काही प्रभागांमध्ये महिला आरक्षण पुन्हा होईल.

(८.८) अनुसूचित जमातीच्या महिलांकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करण्याकरिता अनुसूचित जमातीकरिता आरक्षित झालेल्या प्रभागांमधून सोडत काढण्यात यावी. मात्र मागील निवडणुकीमध्ये कोणत्याही प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित झालेले प्रभाग त्यावेळी वगळण्यात यावेत. असे प्रभाग वगळल्यानंतर उर्वरित प्रभाग अनुसूचित जमातीच्या महिला आरक्षणाकरीता विचारात घ्यावेत व त्यातुन सोडत काढण्यात यावी.

जर असे प्रभाग आवश्यकतेपेक्षा कमी प्रभाग उपलब्ध होत असतील तर ते अनुसूचित जमातीच्या महिलांकरिता थेट आरक्षित होतील. आणि त्यानंतर उर्वरित जागांकरीता वगळण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या प्रभागातून पुढे नमूद तत्वानुसार सोडतीने निश्चित करण्यात यावेत.

असे करताना शक्यतोवर लगतच्या निवडणूकीमध्ये महिलांकरीता आरक्षित झालेले प्रभाग पुन्हा महिलांकरीता आरक्षित होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. प्रथम यथास्थिती मागील एकाही निवडणूकीमध्ये महिलांकरीता आरक्षित न झालेल्या प्रभागांना प्राधान्य देण्यात यावे. जर असे प्रभाग नसतील तर, सर्वात अगोदरच्या निवडणूकीपासून महिलांकरीता आरक्षित झालेल्या प्रभागांचा विचार करावा (उदा. प्रथम केवळ २००५, नंतर २०१० व इतर पर्याय नसल्यास २०१५). काही अपरिहार्य परिस्थितीमध्ये काही प्रभागांमध्ये महिला आरक्षण पुन्हा होईल.

(८.९) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिलांसाठी (नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसह) आरक्षण चक्रानुक्रमे निश्चित करताना यापूर्वी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्यावेळी ज्या प्रभागांमध्ये आरक्षण आले असेल ते प्रभाग वगळून सोडत काढण्यात यावी. याकरिता नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे व महिलांचे आरक्षण चक्रानुक्रमे फिरवून सोडत काढताना अनुसरावयाची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे राहील :-

(अ) प्रथम सर्व प्रभागांपैकी या निवडणुकीमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित झालेले प्रभाग वगळण्यात यावेत.

(ब) त्यानंतर उर्वरित प्रभागांमधून मागील निवडणुकांमध्ये (उदा. यथास्थिती सन २००५, २०१० व २०१५) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित असलेले प्रभाग वगळण्यात यावेत.

शिल्लक राहिलेल्या प्रभागांची संख्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरीता आरक्षित करावयाच्या पदांच्या संख्येपेक्षा कमी असल्यास प्रथम ते सर्व प्रभाग नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरीता आरक्षित होतील व उर्वरित सर्वात अगोदरच्या निवडणूकीत नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरीता आरक्षित झालेल्या प्रभागामधून सोडतीने निश्चित करण्यात येतील.

(क) शिल्लक राहिलेल्या प्रभागांची संख्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरीता आरक्षित करावयाच्या पदांच्या संख्येपेक्षा जास्त असल्यास त्या प्रभागांमधून, **नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांव्यतिरिक्त उर्वरित प्रभाग** (म्हणजेच नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित करावयाच्या एकूण संख्येमधून नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या स्त्रियांकरिता आरक्षित करावयाची संख्या वजा केल्यानंतर येणाऱ्या संख्येइतके प्रभाग) सोडतीने निश्चित करण्यात यावेत.

(ड) त्यानुसार उर्वरित प्रभागांच्या चिठ्ठयांमधून मागील निवडणुकीमध्ये कोणत्याही प्रवर्गातील स्त्रियांकरिता आरक्षित असलेले प्रभाग वगळून शिल्लक राहिलेल्या प्रभागांमधून नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांची सोडत काढण्यात यावी.

(इ) मात्र, जर उर्वरित प्रभागांच्या चिठ्ठयांमधून मागील निवडणुकीमध्ये कोणत्याही प्रवर्गातील स्त्रियांकरिता आरक्षित असलेले प्रभाग वगळून शिल्लक राहिलेल्या प्रभागांची संख्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांकरिता आरक्षित पदांच्या संख्येपेक्षा कमी असल्यास, शिल्लक राहिलेले सर्व प्रभाग नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांकरिता आरक्षित होतील व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांकरिता

आरक्षित करावयाचे उर्वरित प्रभाग, वगळण्यात आलेल्या प्रभागांमधून सोडतीने निश्चित करण्यात येतील. परंतु, असे करताना शक्यतोवर लगतच्या निवडणूकीमध्ये महिलांकरीता आरक्षित झालेले प्रभाग पुन्हा महिलांकरीता आरक्षित होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. प्रथम यथास्थिती मागील तीन निवडणूकांमध्ये महिलांकरीता आरक्षित न झालेल्या प्रभागांना प्राधान्य देण्यात यावे. जर असे प्रभाग नसतील तर, सर्वात अगोदरच्या निवडणूकीपासून महिलांकरीता आरक्षित झालेल्या प्रभागांचा विचार करावा (उदा. प्रथम केवळ २००५, नंतर २०१० व इतर पर्याय नसल्यास २०१५). काही अपरिहार्य परिस्थितीमध्ये काही प्रभागांमध्ये महिला आरक्षण पुन्हा होईल.

(८.१०) <u>सर्वसाधारण महीलांचे प्रभाग निश्चित करणे:-</u> अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे प्रभाग वगळून, उर्वरित प्रभागांच्या चिठ्ठयांमधून मागील निवडणुकीमध्ये कोणत्याही प्रवर्गातील स्त्रियांकरिता आरक्षित असलेले प्रभाग वगळून शिल्लक राहिलेल्या प्रभागांमधून सर्वसाधारण स्त्रियांकरिता आरक्षित प्रभागांची सोडत काढण्यात यावी.

शिल्लक राहिलेल्या प्रभागांची संख्या सर्वसाधारण स्त्रियांकरिता आरक्षित पदांच्या संख्येपेक्षा कमी असल्यास, शिल्लक राहिलेले सर्व प्रभाग सर्वसाधारण स्त्रियांकरिता आरक्षित होतील व सर्वसाधारण स्त्रियांकरिता आरक्षित करावयाचे उर्वरित प्रभाग वगळण्यात आलेल्या प्रभागांमधून (मागील निवडणुकांमध्ये महिला आरक्षण असल्यामुळे) सोडतीने निश्चित करण्यात येतील. परंतु, असे करताना शक्यतोवर लगतच्या निवडणूकीमध्ये महिलांकरीता आरक्षित झालेले प्रभाग पुन्हा महिलांकरीता आरक्षित होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. प्रथम यथास्थिती मागील निवडणूकांमध्ये महिलांकरीता आरक्षित न झालेल्या प्रभागांना प्राधान्य देण्यात यावे. जर असे प्रभाग नसतील तर, सर्वात अगोदरच्या निवडणूकीपासून महिलांकरीता आरक्षित झालेल्या

प्रभागांचा विचार करावा (उदा. प्रथम केवळ २००५, नंतर २०१० व इतर पर्याय नसल्यास २०१५). काही अपरिहार्य परिस्थितीमध्ये काही प्रभागांमध्ये महिला आरक्षण पुन्हा होईल.

(८.११) सोडतीचे इतिवृत्त ठेवण्यात यावे. तसेच सोडतीचा निकाल **परिशिष्ट-१२ व १३** मध्ये नमूद करावा.

(८.१२) सोडतीचा निकाल वेबसाईटवर टाकण्यात यावा.

**९. प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करणे**

(९.१) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १० मधील तरतुदीनुसार सर्व आरक्षण नमूद करूनच प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात यावी. त्यामुळे नागरिकांचा मागासवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्ग महिलांसह) यांच्याकरिता कोणते प्रभाग आरक्षित होतील, हे प्रथम सोडतीव्दारे निश्चित करण्यात येईल व त्यानंतर सदर आरक्षण नमूद करूनच प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिध्द करण्यात यावी.

(९.२) महिला व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची सोडत काढल्यानंतर प्रारुप प्रभाग रचना संबंधित जिल्हाधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम १० खालील परंतुकानुसार प्रथम प्रसिध्द करावी व त्या प्रसिध्दीची सूचना त्या क्षेत्रात खप असलेल्या वर्तमानपत्रात दयावी.

(९.३) प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना व त्यावर हरकती व सूचना स्विकारण्याचा कालावधी व त्या कोणामार्फत स्विकारण्यात येतील यांचा तपशील यास व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रे, नगरपरिषदा/नगरपंचायती व प्रभाग कार्यालयांचे नोटीस बोर्ड, वेबसाईट, इत्यादी)

(९.४) प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांची योग्यरितीने दखल घेण्यात येईल, याची उपाययोजना जिल्हाधिकारी यांनी करावी. (उदा. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांची नोंदवही ठेवणे, हरकती कोणामार्फत स्विकारण्यात येतील यांची निश्चिती, प्रत्येक हरकती व सूचनांना क्रमांक देणे, हरकतीचे स्वरुप नमूद करणे, इत्यादी)

**१०. प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देणे:-**

(१०.१) संबंधित जिल्हाधिकारी प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर निश्चित केलेल्या स्थळी व नेमून दिलेल्या दिनांकास / कालावधीमध्ये सुनावणी देतील.

(१०.२) या सुनावणीकरिता सर्व व्यवस्था (उदा. हरकतदारांना सुनावणीची लेखी नोटीस देणे, उपस्थितांची स्वाक्षरी घेणे, सुनावणीचे विवरणपत्र ठेवणे, सुनावणीच्या ठिकाणी व्हिडिओ चित्रीकरणाची व्यवस्था करणे, इत्यादी) संबंधित जिल्हाधिकारी यांनी करावी.

(१०.३) हरकती व सूचनांना सुनावणी देणारे संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक तक्रार व सूचनांची दखल घेऊन नियमाप्रमाणे योग्य ते अभिप्राय देणे आवश्यक आहे. अंतिम प्रभाग रचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात येते. त्यामुळे त्यांनी घेतलेला निर्णय अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविण्याची आवश्यकता नाही.

**११. अंतिम प्रभाग रचना तयार करणे व त्यास मान्यता घेऊन प्रसिध्दी देणे:-**

(११.१) नगरपरिषद/नगरपंचायतीच्या प्रभाग रचनेस मान्यता देण्याबाबत आयोगाचे आदेश क्र.रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१(१)/का-६ दि.०६/०२/२०२० अन्वये खालील प्रमाणे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

| नगरपरिषदेचा वर्ग | अधिकार प्रदान करण्यात आलेले सक्षम अधिकारी | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **प्रारुप प्रभाग रचना तयार करणे** | **प्रारुप प्रभाग रचनेस मान्यता देणे** | **प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करणे** | **प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी देणे** | **सुनावणीअंती जिल्हाधिकाऱ्यांकडून प्राप्त अहवालानुसार अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे** |
| **अ** | मुख्याधिकारी | जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य निवडणूक आयुक्त यांच्याकडे सादर करणे | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी | राज्य निवडणूक आयुक्त |
| **ब** | मुख्याधिकारी | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी | राज्य निवडणूक आयुक्त |
| **क** | मुख्याधिकारी | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |
| **नगरपंचायत** | मुख्याधिकारी | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |

(११.२) सुनावणी देणारे संबंधित जिल्हाधिकारी यांनी सुनावणीनंतर तयार केलेला प्रस्ताव परिच्छेद (११.१) मध्ये नमूद केल्यानुसार संबंधितांकडे अंतिम मान्यतेसाठी सादर करावा.

(११.३) परिच्छेद (११.१) मध्ये नमूद केल्यानुसार संबंधितांनी मान्यता दिल्यानंतर त्यानुसार प्रभाग रचनेच्या प्रस्तावात (सर्व विवरणपत्रे, नकाशे व अधिसूचना) योग्य ते बदल संबंधित जिल्हाधिकारी यांनी करावेत.

(११.४) त्यानंतर अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडून शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात येईल.

(११.५) या अंतिम अधिसूचनेला व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रात व स्थानिक पातळीवर, तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपरिषदा/नगरपंचायती व प्रभाग कार्यालयांचे नोटीस बोर्ड व नगरपरिषद/नगरपंचायतीच्या वेब साईटवर, इत्यादी) अंतिम प्रभाग रचनेच्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेची प्रत राज्य निवडणूक आयोगास पाठविण्यात यावी.

(११.६) प्रभाग रचनेच्या (दोन्ही प्रारुप व अंतिम) प्रसिध्द करण्यात येणाऱ्या नकाशांवर मुख्याधिकारी तसेच संबंधित नगर रचनाकार यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. तसेच सर्व परिशिष्टांवर मुख्याधिकारी यांची स्वाक्षरी आवश्यक राहील.

१२. **सर्वसाधारण:-**

या आदेशासंदर्भात कोणतीही अडचण अथवा शंका असल्यास यासंदर्भात खुलासा करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाचे असतील.

( यु. पी. एस. मदान )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

सहपत्र :- परिशिष्ट १ ते ९ (प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावाबाबत)
परिशिष्ट १० (सोडतीच्या जाहीर सूचनेचा नमुना)
परिशिष्ट ११ (सोडत काढण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे)
परिशिष्ट १२ व १३ (सोडतीनंतर भरावयाची विवरणपत्रे)

प्रति,

१. सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
३. सर्व विभागीय आयुक्त
४. सर्व जिल्हाधिकारी
५. सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
६. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी व कार्यासने
७. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील
८. निवड नस्ती/कार्या.६

## परिशिष्ट - १ (सदस्य संख्या व आरक्षणाची परिगणना)

## नगरपरिषदा/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक -------

१. नगरपरिषद/नगरपंचायतीचे नाव -

२. नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्राची एकूण लोकसंख्या
(लगतच्या जनगणनेनुसार) -

३. अनुसूचित जातीची लोकसंख्या -
(लगतच्या जनगणनेनुसार)

४. अनुसूचित जमातीची लोकसंख्या -
(लगतच्या जनगणनेनुसार)

५. निवडून द्यावयाच्या नगरपरिषद/नगरपंचायत
सदस्यांची संख्या -

६. प्रभागांची एकूण संख्या -

**७. प्रभागाची सरासरी लोकसंख्या**

$$\text{सूत्र} = \frac{\text{नगरपरिषद/ नगरपंचायतीची एकूण लोकसंख्या (अनु.क्र.२)}}{\text{नगरपरिषद/नगरपंचायतीची एकूण सदस्य संख्या (अनु.क्र.५)}}$$

| प्रभागांची संख्या | सरासरी लोकसंख्या | कमाल (+) १०% | किमान (-) १०% |
|---|---|---|---|
| | | | |

८. अनुसूचित जातीकरीता राखून ठेवावयाचे एकूण प्रभाग -
(स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)

$$(\text{सूत्र} = \frac{\text{अनुसूचित जातींची लोकसंख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times \text{एकूण सदस्य संख्या})$$

९. अनुसूचित जमातीकरीता राखून ठेवावयाचे एकूण प्रभाग -
(स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)

$$\left( \text{सूत्र} = \frac{\text{अनुसूचित जमातींची लोकसंख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times \text{एकूण सदस्य संख्या} \right)$$

१०.नागरिकांच्या मागासवर्गासाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागा (स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)

$$\left( \text{सूत्र} = \text{अनुक्रमांक ५ मधील एकूण सदस्य संख्या} \times \frac{२७}{१००} \right)$$

११.अ) स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागा

$$\left( \text{सूत्र} = \frac{\text{एकूण सदस्य संख्या}}{2} \right)$$

ब) स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागांची विभागणी

१.अनुसूचित जातीसाठी

$$\left( \text{सूत्र} = \frac{\text{अनुसूचित जातींची आरक्षित सदस्य संख्या}}{2} \right)$$

२. अनुसूचित जमातीसाठी

$$\left( \text{सूत्र} = \frac{\text{अनुसूचित जमातींची आरक्षित सदस्य संख्या}}{2} \right)$$

३. नागरिकांच्या मागासवर्गासाठी

$$\left( \text{सूत्र} = \frac{\text{नागरिकांच्या मागसवर्ग प्रवर्गासाठी आरक्षित सदस्य संख्या}}{2} \right)$$

४.स्त्रियांसाठी उपलब्ध होणा-या उर्वरित जागा

( सूत्र = अ.क्र. ११ (अ) - [ अ.क्र.११ (ब१) + ११ (ब२) + ११ (ब३)] )

५. एकूण

१२. अराखीव

( सूत्र = अ.क्र. ५ - [अ.क्र.८ + अ.क्र.९ + अ.क्र.१० + अ.क्र.११ ( ब४ )] )

सही

जिल्हा.....

मुख्याधिकारी, .............. नगरपरिषद/नगरपंचायत

**टीप :-** स्त्रियांकरिता राखून ठेवावयाच्या जागांच्या संख्येची गणना करताना ०.५० हा अपूर्णांक पुढील संख्येस पूर्णांकित करण्यात यावा.

## परिशिष्ट २ (हद्दींची व्याप्ती व वर्णनाबाबत)

## नगरपरिषद/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक -----

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नाव असल्यास | प्रभागाची व्याप्ती (प्रभागातील थोडक्यात महत्त्वाची ठिकाणे/परिसर/नगरे इ. नमूद करावीत) | प्रभागाच्या सीमा | आरक्षणाची स्थिती किती जागा कोणत्या प्रवर्गासाठी जसे अनु.जाती / अनु.जमाती / नागरिकांच्या मागासवर्गासाठी व स्त्रियांसाठी (अनु.जाती / अनु. जमाती /नागरिकांच्या मागासवर्ग स्त्रियांसाठी धरुन ) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| प्रभाग क्रमांक -<br>लोकसंख्या-<br>एकूण -<br>अ.जा. -<br>अ.ज. - | | | उत्तर -<br>पूर्व -<br>दक्षिण -<br>पश्चिम - | |

सही

मुख्याधिकारी, ...............नगरपरिषद/नगरपंचायत

टीप - हा नमुना इंग्रजी व मराठी दोन्ही भाषांमध्ये असावा.

| परिशिष्ट 3 (निवडणूक प्रभागांमध्ये समाविष्ट प्रगणक गट व लोकसंख्या) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ELECTION WARDWISE INFORMATION | | | | | |
| ...........Municipal Council/Nagar Panchayat | | | | | |
| Election Ward No. | Census Enumaration | | Total Population | SC Population | ST Population |
| | Ward No. | Block No. | | | |
| 1 | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| Total | | | | | |
| 2 | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| Total | | | | | |
| 3 | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

सही

मुख्याधिकारी
.........नगरपरिषद/नगरपंचायत

| परिशिष्ट ४ (प्रगणक गटनिहाय माहिती) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **ENUMARATION BLOCKWISE INFORMATION** | | | | | | |
| **..................... MUNICIPAL COUNCIL/NAGAR PANCHAYAT** | | | | | | |
| **SR. No.** | **Enumaration Ward No.** | **Enumaration Block No.** | **Total Population** | **SC** | **ST** | **WARD NO. IN Which the EB is included** |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

सही
मुख्याधिकारी, .........नगरपरिषद/नगरपंचायत

| नमुना विवरणपत्र | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **...........MUNICIPAL COUNCIL/NAGAR PANCHAYAT** | | | | | | |
| **SR. No.** | **Enumaration Ward No.** | **Enumaration Block No.** | **Total Population** | **SC** | **ST** | **WARD NO. IN Which the EB is included** |
| १ | १ | १ | .. | ... | ... | १ |
| २ | १ | ३ | .. | ... | ... | ५ |
| ३ | १ | ४ | .. | ... | ... | १ |
| ४ | २ | १ | .. | ... | ... | ६ |
| ५ | २ | २ | .. | ... | ... | ६ |
| ६ | २ | ३ | .. | ... | ... | २ |
| ७ | २ | ४ | .. | ... | ... | २ |
| . | . | | | | | |
| . | . | | | | | |
| | याप्रमाणे | याप्रमाणे | | | | |

| परिशिष्ट ५ (अनुसूचित जातीचा प्रभागनिहाय उतरता क्रम) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ..................... MUNICIPAL COUNCIL/NAGAR PANCHAYAT | | | | | | |
| STATEMENT SHOWING SHEDULE CASTE DESCEDING ORDER | | | | | | |
| SR. No. | Ward No. | Total | SC | ST | SC% | RESVN |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

सही
मुख्याधिकारी, ......नगरपरिषद/नगरपंचायत

| परिशिष्ट ६ (अनुसूचित जमातीचा प्रभागनिहाय उतरता क्रम) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ..................... MUNICIPAL COUNCILS | | | | | | |
| STATEMENT SHOWING SHEDULE TRIBE DESCEDING ORDER | | | | | | |
| SR. No. | Ward No. | Total | SC | ST | ST% | RESVN |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

सही
मुख्याधिकारी, .........नगरपरिषद/नगरपंचायत

## परिशिष्ट ७ (सदस्य संख्या व आरक्षणाचे एकत्रित विवरणपत्र)

### नगरपरिषद/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक सन ------

### . . . . . नगरपरिषद/नगरपंचायत प्रभाग रचना

| लोकसंख्या | | | सरासरी | |
|---|---|---|---|---|
| एकूण | अनुसुचित जाती | अनुसुचित जमाती | किमान | |
| | | | कमाल | |

| एकूण सदस्य संख्या व आरक्षण | | | | |
|---|---|---|---|---|
| एकूण सदस्य | अनुसुचित जाती | अनुसुचित जमाती | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण |
| | | | | |
| पैकी स्त्रियांसाठी आरक्षित पदे | | | | |
| | | | | |

| नवीन प्रभागाचा क्रमांक | एकूण लोकसंख्या | अनुसुचित जाती लोकसंख्या | अनुसुचित जमाती लोकसंख्या | अनुसुचित जातीच्या लोकसंख्येची टक्केवारी | अनुसुचित जमाती लोकसंख्येची टक्केवारी | अनुसुचित जातीच्या लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार उतरत्या क्रमाने अनुक्रमांक | अनुसुचित जमातीच्या लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार उतरत्या क्रमाने अनुक्रमांक | सन-२००५ च्या निवडणूकीतील आरक्षण | | परिशिष्ट-१० नुसार सन-२०१० च्या निवडणूकीतील आरक्षण | | परिशिष्ट-११ नुसार सन-२०१५ च्या निवडणूकीतील आरक्षण | | सन-२०२० च्या निवडणूकीतील आरक्षण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | आरक्षण | स्त्रियांसाठी असल्यास | आरक्षण | स्त्रियांसाठी असल्यास | आरक्षण | स्त्रियांसाठी असल्यास | आरक्षण | स्त्रियांसाठी असल्यास |
| २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |

सही

मुख्याधिकारी --------नगरपरिषद/नगरपंचायत

## परिशिष्ट – ८ (प्रगणक गटाचे विभाजन करताना द्यावयाचे)

जनगणना प्रभाग क्रमांक ----------- पैकी प्रगणक गट क्रमांक ------- फोडणे
**आवश्यक ठरेल त्याची चौकशी करुन लोकसंख्या निश्चित केली त्याचा तपशिल**

सर्वेक्षण केल्याची तारीख :-----------------

| अ.क्र. | जनगणना घर क्रमांक | कुटुंब प्रमुखाचे नाव | सन २०११ ची लोकसंख्या | अनुसूचित जाती (असल्यास लोकसंख्या) | अनुसूचित जमाती (असल्यास लोकसंख्या) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |
| | **एकूण** | | | | |

| | एकूण | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती |
|---|---|---|---|
| १. प्रगणक गटाची लोकसंख्या | | | |
| २. फोडलेल्या प्रगणक गटाचे सर्वेक्षण प्रमाणे निश्चित केलेली लोकसंख्या (वजा) | | | |
| ३. लगतच्या निवडणूक प्रभागांसाठी विचारात घ्यावयाची उर्वरित लोकसंख्या (वरील १ - २ ) | | | |

मुख्याधिकारी
-------------नगरपरिषद/नगरपंचायत

# परिशिष्ट - ९

## प्रमाणपत्र - प्रारुप प्रभाग रचना

जिल्हयाचे नाव - ........................

नगर परिषद/नगरपंचायतीचे नाव - .......................

मी............................ मुख्याधिकारी, ....................नगरपरिषद/नगरपंचायत, जिल्हा- .......... असे प्रमाणित करतो की, .............. नगर परिषद/नगरपंचायत -------च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेली प्रारुप प्रभाग रचना खालील दक्षता घेऊन करण्यात आलेली आहे.

१) सन २०११ च्या लोकसंख्येची आकडेवारी व प्रगणक गटांचे नकाशे जनगणना कार्यालयाकडून प्राप्त करुन घेतलेले आहेत. ज्या ठिकाणी जनगणना कार्यालयाकडून माहिती प्राप्त झालेली नाही. तेथे २०११ ची लोकसंख्या सर्वेक्षण करुन निश्चित करण्यात आलेली आहे. याबाबत आवश्यक ते प्रमाणपत्र संचालक, जनगणना कार्यालय यांच्याकडून घेण्यात आलेले आहे. (*)

२) प्रभाग रचना करण्याकरीता गुगल मॅप व जनगणना कार्यालयाकडील प्राप्त प्रगणक गट नकाशांचा वापर करण्यात आलेला आहे.

३) प्रभाग रचना तयार करताना अधिनियम, नियम तसेच राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, निदेश व सूचना यांचे तंतोतंत पालन करण्यात आलेले आहे.

स्वाक्षरी

ठिकाणः----------------

(नाव ------------------------------)

दिनांकः---------------

मुख्याधिकारी,...... नगर परिषद/नगरपंचायत

जिल्हा- ...............

**(*) सदर मजकूर आवश्यक असेल तेथेच नमूद करण्यात यावा.**

## परिशिष्ट १०

## (सोडत व प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दी – जाहीर सूचनेचा नमुना)

### नगरपरिषद/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक -----

जाहीर सूचना

---------- नगरपरिषद/नगरपंचायतीच्या सन २०२०मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग/नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिला व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याकरीता सोडत काढणे, तसेच प्रभाग रचनेचे प्रारुप प्रसिध्द करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | आरक्षण सोडत दिनांक | वार ---------<br>दिनांक ---------<br>सकाळी ------- वा.<br>स्थळ - ----------<br>------------ |
| २ | प्रभाग रचनेचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक | -----वार, दिनांक ------ |
| ३ | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना मुख्याधिकारी, नगरपरिषद /नगरपंचायत यांच्याकडे निवडणूक कार्यालय अथवा संबंधित प्रभाग कार्यालयाचे मुख्यालय येथे सादर कराव्यात) | -----वार, दिनांक --------- ते<br>-----वार, दिनांक ---------<br>(दुपारी ३.०० वा.पर्यंत) |

टीप : हरकती व सूचना दाखल करणाऱ्या नागरीकांना सुनावणी करीता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

**ठिकाण :-------------**

**मुख्याधिकारी**

**दिनांक :-------------**

**--------नगरपरिषद/नगरपंचायत**

# परिशिष्ट ११

## (नगरपरिषद/नगरपंचायत निवडणूकांकरीता आरक्षणाची सोडत काढण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे)

१. नगरपरिषद/नगरपंचायतीच्या आरक्षणाची सोडत राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिवशी काढण्यात यावी.

२. सोडतीच्या तीन ते चार दिवस अगोदर सोडतीची रंगीत तालीम निश्चितपणे करण्यात यावी.

३. सोडतीचे इतिवृत्त लिहिण्यात यावे.

४. सोडत,जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या उप जिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिका-याच्या अध्यक्षतेखाली होईल.

५. सोडतीसाठी व प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दीसाठी करावयाच्या जाहिर सूचनेचा नमुना राज्य निवडणूक आयोगाने परिशिष्टांमध्ये विहित केल्यानुसार राहील. ही सूचना सोडतीच्या दोन/तीन दिवस आधी किमान दोन स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

६. सोडतीसाठी पारदर्शक ड्रम वापरण्यात यावा.

७. ड्रममध्ये टाकावयाच्या चिठ्ठयांचा आकार कमीत कमी **A4** या आकाराचा असावा.

८. चिठ्ठी रोल करुन त्यावर लावण्यात येणारे रबर बॅण्ड एकाच रंगाचे असावे व ते चिठ्ठीच्या मध्यभागी लावावेत.

९. सोडतीच्यावेळी सर्व प्रभाग दर्शविणारा एकत्रित नकाशा तसेच प्रत्येक प्रभागाचा हद्दी दर्शविणारा स्वतंत्र नकाशा ठळकपणे दिसेल अशारितीने लावून ठेवावा. प्रत्येक प्रभागाच्या सीमा सोडतीच्या वेळी स्पष्ट करण्यात याव्यात.

१०.सोडत शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते काढण्यात यावी.

११.कोणत्या पदांच्या आरक्षणाची सोडत कोणत्या प्रभागातून कशाप्रकारे काढण्यात येणार आहे याची सविस्तर माहिती दर्शविणारे पत्रक तयार करून सर्व उपस्थितांना वाटण्यात यावे तसेच त्याला पुरेशी प्रसिद्धी देण्यात यावी.

१२.सोडतीमध्ये आलेला जागा क्रमांक शक्य असल्यास प्रोजेक्टरद्वारे मोठया पडद्यावर दाखविण्यात यावा.

१३.संपूर्ण सोडत प्रक्रियेचे व्हिडीओ चित्रिकरण करण्यात यावे.

१४.सोडतीचे प्रक्षेपण स्थानिक केबल टि.व्ही. वर करावे.

१५.नागरिकांना सविस्तर माहिती देण्यासाठी एक प्रसिद्धीपत्रक तयार करुन त्यास पुरेशा आधी खाली नमूद केल्याप्रमाणे व्यापक प्रमाणावर प्रसिद्धी देण्यात यावी.

i) नगरपरिषद/नगरपंचायतीच्या सूचनाफलकावर

ii) नगरपरिषद/नगरपंचायत प्रभाग समितीच्या सूचना फलकावर

iii) नगरपरिषदा/नगरपंचायतीच्याइतर कार्यालयांमध्ये सूचनाफलकावर

iv) स्थानिक केबल टिव्हीवर

v) फ्लेक्स बोर्ड तयार करून शहरात मुख्य ठिकाणी लावण्यात यावेत.

.................

## परिशिष्ट १२

**नगरपरिषद/नगरपंचायतीचे नाव:** **सोडतीचा दिनांक:**

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | आरक्षण |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ... | | |
| याप्रमाणे | | |

सही/-

मुख्याधिकारी

---------- नगरपरिषद/नगरपंचायत

## परिशिष्ट १३

**नगरपरिषद/नगरपंचायतीचे नाव:** **सोडतीचा दिनांक:**

| अ.क्र. | तपशिल | प्रभाग क्रमांक | पैकी महिलांकरिता आरक्षित झालेल्या प्रभागांचे क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | | |
| २ | अनुसूचित जमाती | | |
| ३ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | | |
| ४ | सर्वसाधारण | | |
| | **एकूण** | | |

सही/-

मुख्याधिकारी

---------- नगरपरिषद/नगरपंचायत